MHRT010001722021

## रत्नागिरी येथील विशेष न्यायालयात

(ला.द.बिले, न्यायाधीश, विशेष न्यायालय, रत्नागिरी यांचेसमोर )

## स्पे.के.०५/२०२१

**(सीएनआर क्रमांक एमएचआरटी०१०००१७२२०२१)**

**महाराष्ट्र शासन करिता** ) **फिर्यादी**
रत्नागिरी ग्रामीण पोलीस ठाणे, )

**विरुध्द**

**५.फैसल फारुक ठाकूर** ) **आरोपी / अर्जदार**
वय २८ वर्षे रा.चौगुले हाउस रुम नं.४ )
नवानगर, डॉकयार्ड रोड, मुंबई –१० )

## निशाणी क्रमांक ५५ वरील आदेश

(दिनांक ०५.०४.२०२१ रोजी खुल्या न्यायालयात जाहीर केला )

१. गुंगीकारक औषधीद्रव्य आणि मनोव्यापारांवर परिणाम करणारे पदार्थ अधिनियम १९८५ कलम ८(क),२०(ब), २९ अन्वये रत्नागिरी ग्रामीण पोलीस ठाण्यात गुन्हा रजिस्टर क्रमांक १४९/२०२० मध्ये फिर्यादीने दिलेल्या प्रथम खबरी

अहवालानुसार आरोपी क्रमांक ५ फैसल फारुक ठाकूर **न्यायालयीन कोठडीत** असल्याने त्याने स्वतःची जामिनावर मुक्तता व्हावी अशा निर्देशाकरिता सदरचा अर्ज फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ४३९ अन्वये केला आहे. मूळ गुन्हयाच्या कामी सदरचा अर्जदार हा आरोपी क्रमांक ५ आहे व त्याला दिनांक २८.१२.२०२० रोजी अटक करण्यात आली असून तेंव्हापासून तो गजाआड आहे.

२. आरोपी क्रमांक ५ तर्फे वकील श्री.ए.ए.झारी व शासनाचा अभियोग पक्ष तथा अन्वेषक अधिका-यांतर्फे सरकारी विधीज्ञ श्री.पी.आर.साळवी यांचे विवेचन ऐकले. अन्वेषण अधिकारी यांनी अर्जास विरोध दर्शविणारे म्हणणे (नि.५६ ) दाखल केले.

३. गुन्हयाचा तपशील असा आहे-

दिनांक १८.१२.२०२० रोजी १०.४० चे सुमारास मौजे हातखंबा येथे गद्रे पेट्रोल पंपासमोर आरोपी क्रमांक १ व २ यांनी त्यांच्या ताब्यात असलेल्या व्हॉल्व्हो लक्झरी बस क्रमांक एमएच-०१-सिव्ही-७२४८ या वाहनाच्या ड्रायव्हर केबीनमध्ये असलेल्या त्यांच्या मालकीच्या सॅकमध्ये २ किलो १३९ ग्रॅम वजनाचा गांजा बाळगलेला आढळून आला. त्यामुळे त्या दोघांना दिनांक १८.१२.२०२० रोजी अटक करण्यात आली. त्यांच्याजवळून झालेल्या तपासात सदरचा गांजा त्यांना आरोपी क्रमांक ३ व ४ यांनी दिला तर त्यांना तो माल आरोपी क्रमांक ५ ने पुरविला असे निष्पन्न झाल्याने

अटकेच्या तारखांनंतर सदरचे आरोपी गजाआड आहेत.

४. अर्जदारातर्फे युक्तीवाद करताना वकील श्री.झारी यांनी असे सांगितले की, गुन्हयाचा तपास पूर्ण झाल्याने अर्जदारास जामीन मंजूर करण्यात यावा. न्यायालयाने निर्देश केलेल्या सर्व अटींचे तो पालन करेल.

५. सरकारी वकीलांच्या युक्तीवादानुसार घडलेला गुन्हा गंभीर असून समाजास घातक आहे. या पुढेही तो असाच गुन्हा करण्याची शक्यता नाकारता येत नाही. म्हणून त्याला जामीन मंजूर करु नये.

६. गुंगीकारक औषधीद्रव्य आणि मनोव्यापारांवर परिणाम करणारे पदार्थ अधिनियम १९८५ चे परिशिष्टातील अनुक्रमांक ५५ नुसार गांजा २० किलोग्रॅमपेक्षा जास्त असेल तर वाणिज्य प्रमाणापेक्षा तो जास्त आहे असे समजण्यात येते. तर गांजा १००० ग्रॅमपेक्षा कमी असेल तर तो लहान प्रमाणात आहे असे समजण्यात येते. या प्रकरणामधील जप्त गांजा हा २ किलो १३९ ग्रॅम असल्याने हे प्रमाण वाणिज्य प्रमाणापेक्षा कमी परंतू लहान प्रमाणापेक्षा जास्त आहे. याच अधिनियमाच्या कलम ३७ नुसार जर वाणिज्य प्रमाणातील अंमली पदार्थ असेल आणि गुन्हा कलम १९,२४ किंवा २७ अ नुसार दाखल असेल तर अशा गुन्हयात जामीन देताना कलम ३७ ची बाधा येते.

अर्थातच सर्व परिस्थिती लक्षात घेता या गुन्हयाचे स्वरुप कलम ३७ च्या कक्षेत येत नाही. **मा.मुंबई उच्च न्यायालयाच्या** गोविंद प्रसाद बर्मन विरुध्द महाराष्ट्र शासन, २००४ ऑलएमआर (क्रिमीनल) ६३५ या निकालपत्रानुसार देखील अशा गुन्हयाला कलम ३७ ची बाधा येत नाही.

७. सदर खटल्यातील आरोपी क्रमांक ५ याच्याविरुध्द अन्य कुठलाही अंमली पदार्थाविषयक खटला दाखल आहे असे पोलिसांचे म्हणणे नाही. तसा सरकारी वकिलांचा युक्तीवादही नाही. अर्थातच **मा.सर्वोच्च न्यायालयाच्या** बिरबल प्रसाद विरुध्द बिहार राज्य, २०१८ (११) एससीसी ४८८, या निकालपत्रानुसार अशा आरोपीला जामीनावर मुक्त करणे चुकीचे ठरणार नाही.

८. अर्जदाराच्या ताब्यातून कोणताही मुद्देमाल जप्त करण्यात आलेला नाही. आता केसचा तपास पूर्ण झाल्याने तसेच या केसमधील इतर आरोपींना जामीन मंजूर केल्याने तुल्यतेच्या (parity) तत्वाचा व एकंदरीत सर्व परिस्थिती लक्षात घेता सदर आरोपीला अटी व शर्ती घालून जामीन मंजूर करावा अशा निष्कर्षास हे न्यायालय पोहोचते. सबब खालील हुकुम करण्यात येत आहे.

**आ दे श**

१. अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. गुंगीकारक औषधीद्रव्य आणि मनोव्यापारांवर परिणाम करणारे पदार्थ अधिनियम १९८५ कलम ८(क),२०(ब), २९ अन्वये रत्नागिरी ग्रामीण पोलीस ठाण्यात गुन्हा रजिस्टर क्रमांक १४९/२०२० मध्ये अर्जदार आरोपी क्र. **५ फैसल फारुक ठाकूर याची** मुक्तता रक्कम रुपये २५,०००/– (रुपये पंचवीस हजार फक्त ) च्या वैयक्तिक एक किंवा अनेक जामीनावर व तितक्याच रकमेच्या जातमुचलक्यावर करण्यात येत आहे.

३. अर्जदाराने प्रकरणाच्या तथ्यांशी परिचित असलेली कोणतीही व्यक्ती न्यायालयासमोर किंवा कोणत्याही पोलीस अधिका–यासमोर अशी तथ्ये उघड करण्यापासून जेणेकरुन परावृत्त होईल अशा प्रकारे तिला प्रत्यक्षपणे किंवा अप्रत्यक्षपणे कोणतेही प्रलोभन दाखवू नये, धमकी देउ नये किंवा वचन देउ नये.

४. अर्जदाराने न्यायालयाची परवानगी घेतल्याशिवाय भारताबाहेर जाउ नये.

५. जामीन या न्यायालयात सादर करावा.

६. सदरचा आदेश सर्व संबंधितांना कळविण्यात यावा.

दिनांक – ०५/०४/२०२१

**(ला.द.बिले)**
न्यायाधीश, विशेष न्यायालय, रत्नागिरी

I affirm that the contents of this P.D.F. file order are same, word to word, as per the original order.

| | | |
|---|---|---|
| Case Number | | Special Case No.5/2021 |
| Name of Stenographer | :- | Mrs.V.S.Kulkarni. |
| Name of Court | :- | Special Court, Ratnagiri. |
| Date of Dictation on computer | :- | 05/04/2021 |
| Order signed by the P.O. on | :- | 05/04/2021 |
| Order uploaded on | :- | 05/04/2021 |